# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.08.2024** **वार– शुक्रवार**

---

**नामदेवांच्या 674 व्या समाधी सोहळ्यानिमित्त कार्यक्रम**

महाराष्ट्राच्या वारकरी कीर्तन परंपरेला संजीवनी देण्याचं मोलाचं कार्य संत नामदेवांनी केलं आहे; संत नामदेवांनी उत्तर भारतात भागवत धर्माचा प्रचार-प्रसार केल्यामुळे या भागात शांतता, समता प्रस्थापित झाली, असं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांनी आज पुण्यात केलं. संत नामदेवांच्या 674 व्या समाधी सोहळ्यानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

**खादी**

खादीला बाजारपेठ मिळवून देण्यासाठी तसंच खादीचा प्रचार प्रसार करण्यासाठी महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळानं येत्या 5 ते 9 ऑगस्ट या कालावधीत पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात खादी महोत्सवाचं आयोजन केलं आहे. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी एस. आर. खरात यांनी आज ही माहिती दिली. 7 ऑगस्ट हा दिवस खादी आणि हातमाग दिवस म्हणून पाळण्यात येतो; त्यानिमित्तानं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

**पर्यटन बस**

पीएमपीएमएलतर्फे आंबेगावच्या शिवसृष्टी आणि स्वामीनारायण मंदिर या स्थळांचा पर्यटन बस सेवेमध्ये समावेश करण्यात आला आहे. शिवसृष्टीसाठी सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत; तर स्वामीनारायण मंदिरासाठी सकाळी सात ते 11 आणि दुपारी चार ते आठ या वेळेत पुणे रेल्वे स्थानक, आणि डेक्कन जिमखाना बस स्थानकातून गाड्या सुटतील असं पीएमपीनं कळवलं आहे.

**राजाराम पूल चौकातील उड्डाणपुल**

सिंहगड रस्त्यावरील राजाराम पूल चौकातील उड्डाणपुलाचं काम जवळपास पूर्ण झालं आहे. पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी या उड्डाणपुलाच्या कामाची पाहणी केली. हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी सातत्याने केली जात असली तरी पूल वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

**स्मार्ट सारथी ॲप**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने या आर्थिक वर्षापासून अंदाजपत्रकात शहरातील विविध उपाययोजना, प्रकल्प, उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी पहिल्यांदाच ऑनलाईन पद्धतीने अभिप्राय मागविण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांचे अभिप्राय स्मार्ट सारथी ॲप आणि महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या क्युआर कोडद्वारे संकलित केले जाणार आहेत.

**झिका**
पुण्यातील झिकाच्या रुग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून रुग्णसंख्या 52  झाली आहे. झिकाचा संसर्ग झालेल्या शहरातल्या चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. या रुग्णांना सहव्याधी होत्या. त्यांचे वैद्यकीय अहवाल राज्याच्या आरोग्य विभागाला पाठवले जातील; त्यानंतर आरोग्य विभागाची समिती या रुग्णांच्या मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट करेल अशी माहिती पुणे महापालिकेचे सहायक आरोग्य अधिकारी डॉक्टर सूर्यकांत देवकर यांनी दिली.

**संसर्गजन्य आजार**
पुण्यात संततधार पावसामुळे जलजन्य आणि कीटकजन्य आजारांचा प्रार्दुभाव वाढत आहे; हे आजार रोखण्यासाठी महापालिका पूरग्रस्त भागात औषध फवारणी करत आहे. नागरिकांनीही याबाबत दक्ष राहून आजाराची कोणतीही लक्षणं आढळून आली तर तातडीने औषधोपचार घ्यावेत असं आवाहन महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉक्टर नीना बोराडे यांनी केलं आहे.

**ज्येष्ठ कलाकारांसाठी विरंगुळा केंद्र**
ऑल आर्टिस्ट फाउंडेशन महाराष्ट्र या संघटनेनं पुण्यातील ज्येष्ठ कलाकारांसाठी स्नेह मेळाव्याचं आयोजन नुकतंच केलं होतं. राज्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यावेळी उपस्थित होते. ज्येष्ठ कलाकारांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्याकरता सर्वतोपरी सहकार्य करू अशी ग्वाही पाटील यांनी यावेळी दिली. ज्येष्ठ कलाकारांच्या समस्यांसंदर्भात; सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासमवेत लवकरच बैठक घेऊ असंही ते म्हणाले.

**मनोज जरांगे**
मनोज जरांगे यांचा अटकेचा आदेश 3 हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर रद्द करण्यात आला आहे. पुणे सत्र न्यायालयात आज ही सुनावणी झाली. मनोज जरांगे यांच्यावर 10 वर्षांपूर्वीच्या एका नाट्य निर्मात्याच्या फसवणुकीच्या प्रकरणात अटकेचे आदेश जारी करण्यात आले होते. या प्रकरणी पुढील सुनावणी 3 सप्टेंबरला होणार आहे.

**हॉटमिक्स प्लांट**
पुणे महापालिकेचा येरवड्यातला हॉटमिक्स प्लांट बंद पडला आहे. त्यामुळे रस्त्यांची दुरवस्था झालेली असताना महापालिकेला डांबर मिळणे बंद झाले आहे. महापालिकेच्या पथ विभागाने 1 मार्च पासून आतापर्यंत साडे 8 हजार खड्डे बुजवले आहेत.

**केदारनाथ**
केदारनाथ यात्रेला गेलेले शेकडो यात्रेकरू ढगफुटी सदृश्य जोरदार पाऊस आणि भूस्खलनामुळं तिथेच अडकून पडल्याच्या वृत्तानंतर पुण्यातून केदारनाथ यात्रेसाठी जाणाऱ्या नागरिकांनी आपली सहल रद्द केली आहे. कासारवाडीतील 100 हून अधिक नागरिकांनी या सहलीचं स्वतः आयोजन केलं होत.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज पावसाची संततधार सुरू आहे. उद्याही शहर आणि परिसरात मध्यम स्वरूपाच्या पावसाचा तर घाट क्षेत्रात काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**